

**Book Exhibitions on 16 September 2013**




**Book Exhibition cum sale at college campus 2014**



**Marathi Bhasha Din Book Exhibition 20/02/2017**




**Chitra Pradarshan 19/09/2017**




**Vachan Prerana Din 13/10/2017**




**Marathi Bhasha Din Book Exhibition 11/01/2018**

शनिवार, १४ सप्टेंबर २०१३

पुण्य नगरी

औरंगाबाद वृत्तवेध

## नेहरू महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन

**औरंगाबाद :** पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात ग्रंथालय विभागातर्फे एकदिवसीय ग्रंथ प्रदर्शन १६ सप्टेंबर रोजी आयोजित केले आहे. हे ग्रंथ प्रदर्शन सकाळी १० वाजेपासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत महाविद्यालयामध्ये आयोजित केलेले आहे. या प्रदर्शनाचा जास्तीत जास्त वाचनप्रेमी, विद्यार्थी, पालक व मान्यवरांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी अंभोरे आणि ग्रंथपाल प्रा. राजू तुपे यांनी केले आहे.

लोकसत्ता

शनिवार, २१ सप्टेंबर २०१३



## हैदराबाद मुक्तिसंग्रामदिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शन

हैदराबाद मुक्तिसंग्रामदिनानिमित्त पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात स्वामी विवेकानंद यांच्या जीवनचरित्रावरील ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन सुभाष बोंद्रे यांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ. शिवाजीराव अंभोरे, ग्रंथपाल प्रा. राजू तुपे, रामकृष्ण मिशनचे जालिंदर अकोळकर आदी उपस्थित होते.

सकाळ
औरंगाबाद, रविवार,
२० सप्टेंबर २०१५
२



औरंगाबाद : पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात स्वातंत्र्यसेनानी लाला लक्ष्मीनारायण जैस्वाल यांचा गुरुवारी सत्कार करताना जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष हरिश्चंद्र लघाने. सोबत प्रकाश काळे, प्राचार्य डॉ. अशोक नाईकवाडे, प्रा. भास्कर टेकाडे.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम युवकांनी समजावून घ्यावा

## स्वातंत्र्यसेनानी जैस्वाल यांचे प्रतिपादन

**औरंगाबाद, ता. १९ :** 'मराठवाडा मुक्तिसंग्राम हा प्रेरणादायी व राष्ट्रीय भावना वाढविणारा आहे. त्यामुळे विद्यार्थी व युवकांनी तो अभ्यासावा,' असे प्रतिपादन स्वातंत्र्यसेनानी लाला लक्ष्मीनारायण जैस्वाल यांनी केले.

पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात ध्वजवंदनप्रसंगी ते गुरुवारी (ता.१७) बोलत होते. अध्यक्षस्थानी अजिंठा शिक्षण संस्थेचे सचिव प्रकाश बाबूराव काळे, प्रमुख पाहुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष हरिश्चंद्र लघाने, प्राचार्य डॉ. अशोक नाईकवाडे, प्रा. भास्कर टेकाडे होते. दरम्यान श्री. जैस्वाल यांनी मराठवाडा मुक्ती आणि भारतीय स्वातंत्र्य आंदोलन यावरील ग्रंथप्रदर्शनाचेही उद्घाटन केले. यामध्ये महाविद्यालयाच्या इतिहास विभाग आणि ग्रंथालयाच्या सहकार्याने सुमारे २०० ग्रंथ ठेवण्यात आले होते.

प्राचार्य डॉ. नाईकवाडे यांनी प्रास्ताविक केले. इतिहास विभागप्रमुख प्रा. एस. सी. बनसोडे, ग्रंथपाल आर. आर. तुपे, कार्यालय अधीक्षक एम. आर. खान, प्रशांत सोने, डॉ. शिवाजी अंभोरे, प्रा. भास्कर टेकाळे उपस्थित होते.